प्रेसनोट.दि. ०६/०४/२०२४.

# जबरी चोरी करणारा, सराईत गुन्हेगारास शहर गुन्हे शाखेकडून अटक

---

दि. ०५/०४/२०२४ रोजी, बिराजदार हायस्कूल, मित्र नगर, शेळगी, सोलापूर येथे रात्री ०९:४५ ते ०९:५५ वा.चे दरम्यान अज्ञात आरोपीने, इसम नामे-प्रविण मुरारी सागर, रा.सोलापूर यास मारहाण करून, त्याचे खिशातील १७००/- रूपये जबरीने काढून घेतले तसेच, प्रविण सागर याचा मोबाईल घेवून, त्यातील फोन-पे अकाऊंट वरून, ८०००/- रूपये अज्ञात आरोपीने स्वत:चे अकाऊंटवर ट्रान्सफर करून, घेतले होते. या बाबत, जोडभावी पेठ पोलीस ठाणे येथे, गु.र.क्र १६७/२०२४ भादविक ३४१, ३९४ अन्वये गुन्हा दाखल करणेत आला आहे. सदरचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा उघडकीस आणणेसाठी गुन्हे शाखेकडील तपास पथकांनी घटनास्थळी तात्काळ भेट दिली होती.

घटनास्थळी भेट दिलेनंतर, गुन्हे शाखेकडील सपोनि/ श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथक सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीची माहिती काढत असताना, सपोनि/ श्रीनाथ महाडिक यांचे तपास पथकास, सदर गुन्हयातील संशयित इसम हा सिफा बेकरी समोर, जुना विडी घरकुल, सोलापुर येथील एका घरासमोर मोटार सायकलीवर बसलेला असल्याची माहिती मिळाली.

त्यावरुन, वरील तपास पथक हे सोबत पंच घेवुन सदर ठिकाणी गेले असता, नमूद संशयित इसम नामे- नितीन विठ्ठल भोसले, वय - २८ वर्षे, रा. २७/३, सग्गम नगर, जुना विडी घरकुल, सोलापुर हा मिळुन आला. सदर इसम हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असल्याने, त्याचेकडे कौशल्याने तपास केला असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याने यातील फिर्यादीकडुन जबरीने काढुन घेतलेली रोख रक्कम १७००/- रु. त्याचे ताब्यातुन जप्त करण्यात आली आहे. तसेच त्याने फिर्यादी यांच्या मोबाईलवरुन जबरदस्तीने त्याचे फोन पे वर ८,०००/- रु. ट्रान्स्फर केल्याचे निष्पन्न झाल्याने सदरचा मोबाईल फोन व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल इत्यादी मुद्देमाल जप्त करुन सदर आरोपीस ताब्यात घेवुन पुढील कारवाईकरीता जोडभावी पेठ पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर आरोपीकडुन त्याचा **सॅमसंग कंपनीचा मोबाईल, तसेच गुन्हयात वापरलेली होन्डा शाईन कंपनीची मोटार सायकल व जबरदस्तीने काढुन घेतलेली रोख रक्कम १७००/-रु., असे एकुण ८३,७००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.**

सदरची कामगीरी श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे , पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/श्रीनाथ महाडीक, पोलीस अंमलदार अंकुश भोसले, शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजीत धायगुडे यांनी केलेली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner